# प्रेस नोट ता. २६/०३/२०२४

## सतीश सुधीर क्षिरसागर सोलापूर व धाराशीव जिल्हयातून ०२ वर्षाकरीता तडीपार

इसम नामे, सतीश सुधीर क्षिरसागर, वय-३२ वर्षे, रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर याचेविरुध्द सन २०१२ ते २०२३ या कालावधीमध्ये, गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा करणे, जीवे ठार मारणे, नागरीकांना शिवीगाळ, दमदाटी व मारहाण करुन गंभीर दुखापत करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द जोडभावी पेठ पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने श्री विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांनी कार्यवाही करुन, त्यांचेकडील तडीपार आदेश क्र. ८१२/२०२४ दि.२२/०३/२०२४ अन्वये, इसम नामे, सतीश सुधीर क्षिरसागर, वय-३२ वर्षे, रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर यास सोलापूर जिल्हा व धाराशीव जिल्हा येथून दोन वर्षाकरीता दि.२५/०३/२०२४ पासून तडीपार केले आहे. त्यास तडीपार केल्यानंतर निगडी, पिंपरी चिंचवड येथे सोडण्यात आलेले आहे.

**( एन. एस. कानडे)**
**पोउपनि,वाचक अधिकारी,**
**पोउपआ परिमंडळ कार्या.सोलापूर शहर.**

CamScanner
Scanned with CamScanner



Scanned with CamScanner